







# सूफी साहित्य: स्वरूप आणि शोध

■ संपादक
डॉ. ताहेर एच. पठाण
प्रा. अर्चना सोनवणे (काटकर)

ISBN-978-81-925358-9-0

Feb 2014

ISBN-978-81-925358-9-0

- Sufi Literature
  सूफी साहित्य: स्वरूप आणि शोध

- *डॉ. ताहेर एच. पठाण*
  *प्रा. अर्चना सोनवणे (काटकर)*

- *प्रकाशक : प्रा. लहाने गंपू*
  वैभव भांडी स्टोअर्स, भांडे गल्ली,
  सुभाष चौक, लातूर

- *प्रकाशक द्वारा*
  संकल्प प्रकाशन प्रा. लि.,
  लातूर जि. लातूर

- *मुखपृष्ठ संकल्पना :*
  राठोड अरविंद किसन

- *आवृत्ती – १ ली.*
  दिनांक : २५/०२/२०१४

- *मांडणी व सजावट :*
  राठोड अरविंद किसन

- *मुद्रक :*
  व्यंकटेश कॉम-प्रिन्टस
  पुंडलिक नगर रोड, गारखेडा परिसर,
  औरंगाबाद.

- मूल्य : ४२५/-

# सूफी साहित्य: स्वरूप आणि शोध

• संपादक •
*डॉ. ताहेर एच. पठाण*
*प्रा. अर्चना सोनवणे (काटकर)*

*टिप :* या ग्रंथात प्रकाशित झालेल्या सर्व लेखातील विचार संबंधित लेखकांचे असून या विचाराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही

ISBN-978-81-925358-9-0



# भारतातील सोळाव्या व सतराव्या शतकातील भक्ती चळवळ व सूफी संतकवी

प्रा. डॉ. श्रीमती एस.ए. इंगळे (गिरी)
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, ओझर (मिग)

प्रस्तावना :

सूफी दर्शन हे इस्लामाचे आध्यात्मिक वैभव आहे. इस्लामच्या साक्षात्कारावादाचे दिव्य तेज त्यात प्रकट झालेले आहे. निरुयोगी पंडीतांना सूफी या शब्दात अनेक अर्थाचे माडोडे सापडलेले आहे.

१) सूफी म्हणजे ऊन तिकडे संन्यस्त ऊनी कपडे वापरु लागले म्हणुन सूफी झाले.

२) सूफी म्हणजे पवित्रता सफा जिवन जगणारे ते सूफी

३) महंमद पैंगबरांच्या काळी मदिना येथील मशिदी च्या समोरच्या बाकावर बसणाऱ्या भक्तांना "अल्हा अल-सुफ्फाह" असे म्हणनत यातील "सुफ्फाह" पासुन "सूफी" अवतरलेला आहे.

४) तसेच ग्रीक शब्द "सोफीस्ता" पासुन " सूफी" आणि "थियोसोफिया"पासुन "तसव्वुफ" अशी ही व्युत्पती देण्यात आलेली आहे ग्रीक मधले सोफी हे ज्ञानार्जनात आणि तत्वचिंतनात मग्न असत परंपरेवर रुढीवर ते विश्वास ठेवीत नसत " सूफी" ही संज्ञा या सोफीपासून उत्पन्न झालेली आहे असे या तत्वज्ञनांचे मत आहे. अत:शुध्दता, अंतर्मुखता, ईश्वर मिलनासाठी उत्पन्न झालेली अनावर व्यामूळता ही सुफी वृत्तीची मुख्य खूण आहे. परमात्माच्या साक्षात्काराची विलक्षण ओढ हे सूफी वृत्तीचे एक महत्वाचे लक्षण आहे. सूफी मत म्हणजे ईश्वर प्रेमाने रसरसलेले जिवंत जाज्वल्य अध्यात्म आहे.

सूफी दर्शनाच्या थोडक्यात आढावा घेतल्यावर असे दिसते की, पापांबददल अनुताप, संसारा विषयी, ऐहिक, वैभवा विषयी आत्यंतिक अनासक्ती, बाहयचारापेक्षा अंत:शुध्दीची निर्विवाद महती. ईश्वरासाठी पागल होण्या इतकी त्यांच्यावर अन्यन्य, अपार अव्यभिचारी प्रीती, समग्रसृष्टीत, सृष्टीतल्या कणाकण्यात ईश्वरच व्यापलेला असल्याची निरपवाद, निशंक प्रतीती, कर्मकांठाकडुन छळ रुपात प्रगट होणारी त्यांची निर्दय वक्र दृष्टी हया बाबतीत सूफी संत आणि भारतीय संत यांच्यात असलेले साम्य यांच्यात असलेली एकात्मता सहज लक्षात येते. सूफी संत राजसत्तेपुढे कधी लाचार झालेले नाही.राजकृपेचा रुपेरी तुकडा मिळावा म्हणुन त्यांनी कधी तोंड वेगाडलेपणा केला नाही. ईश्वरी सानीध्याच्या प्रेमात त्यांनी सगळ्या लौकिक आकर्षणाबददल धिक्कारपुर्वक तुच्छता दाखविली त्यांची मान नेहमी प्रखर निस्पृहतेच्या तोऱ्यात ताठ राहिली. सूफी दर्शनाबाबत संशोधकाचे असे म्हणणे आहे. सूफी दर्शन हा काही एकरस, एकरंग, एकजिनसी प्रवाह नसुन त्यात इतर अनेक धर्मातील साक्षात्कारवादी विचारांचे प्रवाह येऊन मिळालेले दिसुन येतात.

सूफीसंत आणि भारतातील भक्तीमार्ग :-

भारतातील सूफीच्या आगमनाचे पर्व सुरु झाले ते बाराव्या शतकात मुख्यत: तुर्कस्थान, इराक, इराण व अफगाणिस्थनच्या देशातुन आले होते यांची म्हणण्यासारखी खास संघटना नव्हती. राजाश्रयाने छत्र ही यांच्या डोक्यावर नव्हते. सूफी धर्म चार भिन्न संप्रदायाच्या रुपाने आपले प्रचारकार्य करु लागला. १) चिश्ती संप्रदाय २) सुहारवर्दी संप्रदाय ३) कादरी संप्रदाय ४) नक्शबंदी संप्रदाय वरील चार संप्रदायापैकी कादरी संप्रदायाशी महाराष्ट्राच्या पारमार्थिक जीवनाचा निकटच्या संबंध आहे. सूफीच्या पारमार्थिक विचारधारेतले सहज प्रकटणारे हे वचने दिसुन येतात.

१) परमेश्वरासाठी सर्वसंगपरित्याग करणे.

२) एकांतात ईश्वचिंतन करणे.

३) परमेश्वरच एकमेव सत्य.

४) परमेश्वराजवळ अन्यय शरणागती.

५) जिव्र नाम स्मरण.

६) परमात्याबददल अनावर ओढ व प्रेम.

७) परमेश्वराच्या चिंतनात मग्न राहणे.

या सर्व वचनात प्रखर ईश्वर निष्ठे शिवाय दुसरे काही नाही. याशिवाय सेवा व गुरुभक्ती यांची या निष्ठेला जोड आहे ही सगळी विचारधारा भारतीय संताच्या पारमार्थिक विचारधारेशी पुर्णपणे जुळणारी आहे. प्रेममार्गी सूफी साधकांचे आगमन झाल्यानंतर भारतीय भक्तीमार्गात नवाच उत्साह, नवाच आवेग, नवाच उन्माद निर्माण झाला. वस्तुस्थितीच तशी होती राम किंवा कृष्ण किंवा विठठल

अशा कोणत्या तरी एकाच देवतेवर पुर्णपणे केंद्रीत झालेली भक्ती, पापाची टोचणी आणि त्यातुन स्फुरलेल्या अनुतापातुन जागृत झालेले प्रखर विरक्ती, परमेश्वराजवळ अनन्य शरणागती, लौकीक रति, आशा आकांक्षाची कदर न करणारी प्रेमाच्या उन्मुक्त उत्थान अविर्भावातले बेहोश धुंदी सूफी साहित्यात दिसुन येते. भारतीय संस्कृतीने आपल्या अंगावर आर्य पुर्व काव्यपासुनच भक्तीचे दिव्य लेणे धारण केलेले आहे. भारतीयांचा भक्तीमार्ग म्हणजेच भागवत धर्म हा आर्येतर आणि अवैदिक आणि सुफीचाही भक्तीमार्ग म्हणजेच भागवत धर्महाही अर्थातच आर्येतर आणि अवैदिक सुफीचा भक्तीमार्गाचा वृक्ष भारतात रुजला अंकुरला आणि पाहता पाहता वाढला पंधराव्या सोळाव्या शतकात अनेक मुसलमानांची साधक हिंदु देवाच्या आराधनेत ते रंगुन गेले व त्यांनी आपली ही आराधना मराठी ग्रंथरचनेच्या रुपाने मराठी शारदेच्या चरणी रुजू केलेली दिसते यात काही सुफी संत दिसतात त्यांनी भागवत संप्रदायाची साहित्यावर लेखन केलेले दिसते

१) मृत्युंजय :-

हा शहा मुतबजी कादरी या नावाने ओळखला जातो. त्याचा सिध्दसंकेतप्रबंध हा सर्वात मोठा ग्रंथ होय रामाने सितेला केलेला उपदेश असे या ग्रंथाचे स्वरुप होय. मृत्युंजय हा विठलाचा उपासक होता तो मुकुंदराजांच्या खास परंपरेतील एक सतपुरुष असुन त्याने मुंकुदराजाची परंपरा चालु ठेवण्यात व विवेकसिंध्दु महाराष्ट्रभर लोकप्रिय करण्यात विशेष कामगिरी केलेली आहे. मृत्युंजयाच्या सर्व ग्रंथावर विवेकसिंधुच्या भाषेची व विचारांची छाप पडलेली दिसुन यते शहा मुंतोली याने वेदाताच्या अभ्यास केलेला आढळतो.

२) हुसेन अंबरख्रान :

भगवदगीतेचा हा मुसलमान भाष्यकार होय. त्याने रचलेली गीताटीका अंबर हुसेनी म्हणुन प्रसिध्द आहे ही गीताटीका समश्लोकी असून याची ओवीसंख्या ८७१ एवढी आहे हुसेनला आत्मगौरवात आनंद वाटतो. तो स्वत:ला जगव्दंघ म्हणवितो, वंदान्यांचा शिरोमणी" "ब्रम्हज्ञानियांचा मुकूटमणी" असा तो स्वत:च्या गौरव पुर्वक उल्लेख्र करतो एका सूफी संताचे भगवदगितेवरील भक्तीभावाने लिहीलेली सुंदर भाष्य हे दिसुन येते.

३) शेख्र महमंद :

हा कबीराचा महाराष्ट्रातील अवतार अशी लोकश्रध्दा आहे सूफी पंथाच्या कादरी शाख्रेतला क्रांतिकारक विचारांचा हा एक महान संत जनार्दन स्वामींच्या विचारांचा याच्यावर प्रभाव होता. सोळाव्या सतराव्या शतकात, महाराष्ट्रात पारलौकिक आणि लौकिक आध्यात्मीक आणि ऐहिक अशा दोन्ही प्रकारच्या पराक्रमाचा जो भव्य वृक्ष वाढला तो वाढत असतांना त्याला सूफी संताच्या इस्लामी फकीराची कृपेचे वरदान लाभलेले होते. शेख्र महंमदाची वाङःमय निर्मिती मराठी, हिंदी, उर्दु, फारसी इतक्या विविध भाषांत आहे. पण त्यातली महत्वाची जी आहे ती मराठीत आहे योगसंग्राम पवनविजय, निष्कलंक प्रबोध, रुपके, भारुडे, अभंग स्फुट स्वरुपाची कविता त्यांनी लिहीलेली आहे. सदगुरुकृपा ही शेख्र महमंदाची माय माऊली सर्व संसारत्रस्तांना खरा विसावा देणारी ती एकमेव साऊली होय असे विचार आपल्या ग्रंथात त्यांनी मांडले आह.

४) शहामुनी :

"सिध्दांतबोध" या ग्रंथाचा कर्ता महाराष्ट्रातील भाविकांत विशेष लोकप्रिय असा आहे. दत्तात्रेयाचे अनुग्रहित असलेले मुनीन्द्रस्वामी हे शहामुनींचे गुरु हा पराकोटीचा गुरुभक्त होता. आपल्या ग्रंथरचनेचे सर्व महानुभाव तत्वज्ञानाचे दृढ संस्कार शहामुनीच्या मनावर झालेले होते ते सिध्दान्तबोध या ग्रंथात उमटलेले दिसुन येते. हिंदु मुसलमानांतील परस्पर व्देषाच्या निरसनाबददल त्याला विलक्षण तळमळ लागलेली होती आणि ती त्याच्या ग्रंथात ठायी ठायी विस्तारपुर्वक व्यक्त झालेली आहे. सर्वांतर्यामी असलेल्या परमेश्वराच्या स्मरणाने हा व्देषभाव नष्ट व्हावा अशी त्याची सत्वशिल अपेक्षा आहे. जन्मजातीवरुन एख्रादयाला श्रेष्ठ वा कनिष्ठ ठरविणे किती मुख्रंपणाचे आहे हे पटवुन देण्यासाठी त्याने अनेक दाख्रले दिलेले आहे.

सूफी संतकवींचे महत्व :-

मराठी संत सारस्वताचे भांडार समृध्द करण्याचा दृष्टीने या कविंचे वाङ:मयीन कार्य अतीशय तेजाळलेले जरी नसले तरी महाराष्ट्राच्या पारमार्थिक वाङ:मयाच्या दालनाची शोभा त्याचा वाङ:मयीन कार्यामुळे वाढलेली दिसुन यते हे वाङ:मयीन कार्य पदे, अभंग स्फुट रचना या अर्थाने लिहीलेले आहे. उच्च दर्जाच्या आध्यामिक अनुभुतीचे तिला अधिष्ठान लाभलेले आहे. महाराष्ट्रातल्या भक्तीच्या वाटेने मराठी संताच्या मेळावा भागवतांच्या जयघोष करीत चालला होता त्या मेळाव्यात हे सूफी संत मिसळुन गेले, एकरस झाले संतत्व हा त्याचा प्राण आहे कवित्व हा त्याचा संतत्वाने धारण केलेले देह आहे ते सरस्वतीचे खास उपासक नव्हते. महाराष्ट्राच्या भुमीत काव्यगुणांची रंगीबेरंगी फुले उधळण्याकरीता ते जन्मास आलेले नाहीत तर ईश्वरी लिलेच्या गुणानुवादातील अलौकिक आनंदाचा

ISBN-978-81-925358-9-0


महाराष्ट्रावर वर्षाव करण्यासाठी ते अवतरलेले होते. परमार्थ मार्गातील अनावश्यक स्रोत नष्ट करण्याच्या सत्कार्यात हे मुसलमानी संत नेहमीच आघाडीवर राहिलेले दिसुन येतात अशा तऱ्हेने प्रेममार्गी सूफी साधकांचे मराठी संत साहित्यात महत्वाचे योगदान दिसुन येते.

संदर्भ


1) आधुनिक मराठी वाङःमयाच्या इतिहास भाग १ व २ (अ. ना. देशपांडे)

२) कालिदास दर्शन (गो.के. भट)

३) अभिनव काव्यप्रकाश (रा. श्री. जोग)


❑❖❑

TRUE COPY
Principal
K.K.W. College,
Pimpalgaon Baswant